महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२४ वा | दिनांक : ०८/०२/२०२५ | वार : शनिवार

## छत्रपतींविषयी वादग्रस्त बोलून महाराष्ट्र अशांत करण्याचा कट - मंत्री शिवेंद्रराजे भोसले



**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त विधान करून महाराष्ट्रात अशांतता पसरवण्याचा कट रचण्यात आल्याचा संशय राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी यासंबंधी अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केलेल्या विधानाची खोलात जाऊन चौकशी करण्याचीही मागणी केली आहे.

अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी नुकतेच छत्रपती शिवाजी महाराज यांनी मोगलांना लाच देऊन आपली आग्र्याहून सुटका केल्याचा दावा केला होता. त्यांच्या या विधानामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी उपरोक्त संशय व्यक्त केला आहे. ते येथे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राहुल सोलापूरकर यांनी कोणत्या हेतूने वक्तव्य केले, त्याच्या खोलात सरकारने गेले पाहिजे. या माध्यमातून महाराष्ट्रात अशांतता पसरवण्याचा डाव आहे का? हेही सरकारने तपासले पाहिजे. वादग्रस्त बोलायचे आणि राज्य अशांत करायचे, हा खेळ चाललेला आहे, असे मला तरी वाटते.

कलाकार असल्यामुळे आम्हाला समजातले सगळे कळते असे त्यांना वाटते. पण तुम्हाला जर सर्वकाही कळत असते, तर तुम्ही छत्रपतींच्या बाबतीत चुकीच्या पध्दतीने आणि इतिहासाबद्दल एवढ्या बिनधास्तपणे बोलला नसता. राहुल सोलापूरकर यांनी आपल्या विधानाप्रकरणी माफी मागितली असली तरी त्याचा काही उपयोग नाही. सरकारने त्यांच्यावर ताबडतोब कडक कारवाई करावी, अशी मागणी शिवेंद्रराजे यांनी यावेळी केली.

जो इतिहास आपण वाचलाय. त्यात छत्रपतींनी लाच देऊन आग्र्याहून सुटका करून घेतल्याचे लिखाण नाही. छत्रपतींचा मुत्युद्दीपणा दाखवण्याचेच काम इतिहासकारांनी केले. त्यामुळे सोलापूरकरांच्या वक्तव्याने शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. महापुरुषांबद्दल अशा पध्दतीने पुन्हा कोणी वक्तव्य करू नये, अशी कडक कारवाई सरकारने त्यांच्यावर करावी. अशा कारवाईचे उदाहरण समोर ठेवल्याशिवाय अशी लोकं सुधारणार नाहीत, असेही ते यावेळी सोलापूरकर यांच्या विधानाचा निषेध करताना म्हणाले.

## मी तोंड उघडले तर पंकजा मुंडेंचे मंत्रिपद जाईल - करुणा शर्मा

**बीड :** संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरक आहे तो कुठे आहे त्याचं काय झालं याची काहीच माहिती समोर येत नाही. ५० दिवसांहून अधिक काळ लोटला तरी कृष्णा आंधळेचा पत्ता लागत नाही, त्याची हत्या झाली असावी असा दावा करुणा मुंडे यांनी केला आहे.

करुणा मुंडे पुढे बोलताना म्हणाल्या की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेचा दोन महिने झाले तरी तपास लागत नाही. त्याला ठार मारले असेल असा दावा त्यांनी केला आहे. तर धनंजय मुंडे यांच्यासंदर्भात माझ्याकडे बरेच काही बोलण्यासारखे आहे. त्यांच्याकडे आकाची कमी नाही म्हणतानाच त्यांच्या आर्थिक गडबडीची माहिती योग्य वेळ आली की बाहेर काढणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

करुणा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडेंची सवय आहे की, फुट टाका आणि राज्य करा. स्वतः तोंड उघडत नाही आणि माझ्या मुलाला उभे केले. माझा मुलगा फ्रस्टेशनमध्ये होता. आमचे काही बरे वाईट झाले तर हा माणूस स्वतःला माफ करु शकणार आहे का? बापाच्या सांगण्यावरुन त्याने स्टोरी टाकली. माझ्या मुलाला किती कॉल येत होते हे सर्वांनी बघितले आहे.

करुणा मुंडे म्हणाल्या की, तुम्ही मंत्री आहे, मी काही नाही. मी वाईट महिला हे मान्य करते. अनेक मोठ्या गोष्टी आहेत. मी तोंड उघडले धनंजय मुंडेंचेच नाही तर तर पंकजाताईंचे पण मंत्रिपद जाऊ शकते, असा दावा त्यांनी केला आहे. धनंजय मुंडे मला रोडवर सोडू शकत नाही मी त्यांची बायको आहे, आता मला बोलायचे असेल तर कॅबिनेटमध्ये येऊन बोलणार.

मी सीशिव धनंजय मुंडे आहे आणि मला बोलणे महत्वाचे वाटते कारण मिडिया माझ्या कुटुंबाला मनोरंजनाचे साधन बनवत आहेत. माझे वडील कदाचित सर्वोत्कृष्ट नसतील, परंतु ते कधीही आमच्यासाठी हानिकारक नव्हते. तिने ज्या कौटुंबिक हिंसाचाराचा दावा केला आहे तो माझ्यावर, माझ्या बहिणीवर आणि माझ्या वडिलांवरही झाला आहे. माझ्या आईने वडिलांना मारहाण केली तेव्हापासून ते निघून गेले आणि त्यानंतर माझ्या आईने मला आणि बहिणीला सोडून दिले आणि तेथून जाण्यास सांगितले. कारण तिला आमच्याशी काही देणंघेणं नाही. २०२० पासून माझे वडील धनंजय हे माझी काळजी घेत आहेत आणि माझ्या आईला कोणत्याही आर्थिक समस्या नाहीत. माझी आई काही ना काही बहाने बनवत राहते. माझ्या आईने घरावरचं कर्ज सुद्धा फेडलेले नाही. आणि आता ती माझ्या वडिलांविरुद्ध सूडबुद्धीने लढण्यासाठी कथा रचत आहे.

## आजच्या घडीला एकनाथ शिंदेंनाच कोणी विचारात नाही - अंबादास दानवे

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते व विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपमुख्यमंत्री यांच्यावर पुन्हा एकदा टीका केली आहे. आजच्या घडीला शिंदेंना कोणी विचारात नाही. येणाऱ्या काळात शिंदेंना त्यांचे लोक सांभाळणे जड जाणार असल्याचे अंबादास दानवे यांनी म्हंटले आहे.

अंबादास दानवे म्हणाले, आत्ताच्या घडीला शिंदेंनाच कोणी विचारात नाही या महाराष्ट्रामध्ये. आज तुम्ही पाहिले असेल एस.टी महामंडळाचा चेअरमन नियुक्त करताना त्या कॅबिनेटला सुद्धा माहिती दिली नव्हती. असे सरकार असताना या भानगडी शिंदे तरी का करतील असा माझा प्रश्न आहे. छोटे मोठे कार्यकर्ते जाणे ठीक आहे पण प्रत्यक्ष खासदाराविषयीच अशा अफवा पसरवणे चुकीचे आहे. आता एकनाथ शिंदे यांना त्यांचे त्यांचे नेते आमदार सांभाळणे कठीण जाणार आहे. त्यांना त्यांचे सांभाळणे हेच चॅलेंज राहणार आहे.

अंबादास दानवे म्हणाले, भाजप सगळीकडे फिल्डिंग लाऊन बसले आहेत. नितीश कुमारच्या पक्षात देखील त्यांनी तसे केले होते, तसेच एकनाथ शिंदेंच्या पक्षात सुद्धा ते करू शकतात. पुढे ऑपरेशन टायगर बद्दल बोलताना अंबादास दानवे म्हणाले, हे कुठेच नाहीये, हे तुम्ही मीडियाने पासरवलेले आहे. कोणता तरी नेता म्हणाला आहे का ऑपरेशन टायगरबद्दल? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, मुख्यमंत्र्यांना सगळ्यांना विश्वासात घ्यायलाच ५ वर्षे लागतील. त्या पदावर बसून तसेच काम करावे लागते. शेवटी जसे पेरले तसेच उगवत असते. ठीक आहे फडणवीस साहेबांनी एसटीचे केले असेल. पण एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस असताना किती ऐकले त्यांचे? पुरावे आहेत आमच्याकडे, किती फेरबदल झाले आहेत त्याचे. त्यामुळे पेरले तसे उगवत असते हा सृष्टीचा नियम आहे.

अंबादास दानवे म्हणाले, निवडणुकीवर आता सर्व सामान्य जनतेचा सुद्धा विश्वास उरला नाही. आज एक मारकडवाडी आहे, उद्या शेकडो मारकडवाड्या या महाराष्ट्रामध्ये आहेत. दिल्लीमध्ये सुद्धा लोकांच्या भावना अशाच राहिल्या आहेत. भारतीय जनता पक्ष निवडणूक आयोग, पोलिस यंत्रणा सगळे कामाला लावते. त्यामुळे अशा पद्धतीने जर बघितले तर येत्या काळात मतदान करायचेच की नाही करायचे अशा पद्धतीची परिस्थिती निर्माण होऊ शकणार आहे. कारण माझे मत ज्याला पडायचा त्याला पडत नसेल तर मतदान करायला का जायचे? अशी मानसिकता येणाऱ्या काळात झाली तर त्यात आश्चर्य वाटायला नको.

लाडकी बहीण योजनेवर बोलताना अंबादास दानवे म्हणाले, आम्ही जेव्हा लोकांना सांगत होतो तेव्हा लोकांना खोटे वाटत होते. ही निवडणुकीसाठी सुरू केलेली योजना आहे. ही लाच आहे. त्यावेळेस सरसकट मंजूर केले, आता का नाही? आता तुम्हाला सर्वेक्षण आले का? आता चारचाकी दिसायला लागली का? निवडणुकीच्यावेळी नाही दिसली चारचाकी, दुचाकी, ज्यांना दुसऱ्या योजनेचा लाभ मिळत आहे त्यांना या योजनेचा लाभ नाही मिळणार हे त्यावेळी का नाही सांगितले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ फेब्रुवारी २०२५


# दशरथ राठोड यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर



**कन्नड (राहुल थेटे) :** कन्नड शहरातील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे त्याचबरोबर नेहमी चर्चात असणारे युवा उद्योजक आणि तरुणांचे चाहते म्हणायला संकोच नको. असे उगवतं नेतृत्व म्हणजेच दशरथ राठोड यांनी covid-१९ च्या काळात आपले मोलाचे योगदान देऊन बऱ्याच रुग्णांना आरोग्य सेवा पुरवणे त्याचबरोबर आपला गाव सुजलाम सुफलाम व्हावा या उद्देशाने बरेच समाज उपयोगी उपक्रम राबवून त्यांनी आपले योगदान दिल्याचे समजते दशरथ राठोड यांची जीवनाची वाटचाल अत्यंत खडतर असून देखील त्यांनी आपल्या यशाच्या पाऊलखुणा फक्त आपला गावात नसून तर संपूर्ण तालुका आणि जिल्ह्यातही उमटवल्याचे कळते त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेत अनेक सामाजिक राजकीय संघटनेने त्यांना पक्षाचे निमंत्रण दिल्याचे समजते मागील काळात बंजारा ब्रिगेड जिल्हा समितीचे जिल्हाध्यक्ष त्याचबरोबर बंजारा लमान समृद्धी समितीचे कार्य सदस्य व ही म्हणून त्यांनी आपले योगदान दिले.

तरुणांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून स्वतःच्या वैयक्तिक निधीमधून काही खेळाचे आयोजन करून त्यांनी अनेक मुलांच्या मनात आदरस्थान मिळवला आहे. दशरथ राठोड यांच्या कार्याची दखल घेत यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# पारस जालनापुरकर उत्कृष्ट शेती सल्लागार सह्याद्री गौरव पुरस्काराने सन्मानित



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात लासुर येथे होणाऱ्या सह्याद्री जीवन गौरव पुरस्कार समारंभात कन्नड तालुक्यातील उत्कृष्ट शेती सल्लागार चंचल सीड्स संचालक पारस धन्नुलाल जालनापुरकर यांना प्रगतशील शेतकऱ्यांना उत्कृष्ट शेतीविषयक माहिती आणि बियाणे पुरवण्यासाठी उत्कृष्ट सह्याद्री जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाते आणि त्यांच्या या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावे या उद्देशाने हा पुरस्कार देण्यात येत आहे हा पुरस्कार ९ फेब्रुवारी रोजी लासुर येथे पत्रकारांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे यांनी पंधरा वर्षाच्या कार्यकाळात उत्कृष्ट प्रगतशील शेतकऱ्यांना घडवले आहे शेतीविषयक संपूर्ण ज्ञान देऊन विविध काळात शेती उत्पन्न मध्ये भर पडण्यासाठी शेतकऱ्यांना सल्ला दिले आहे अनेक शेतकरी नवीन वार्षिक पिकासाठी यांचा सल्ला घेण्यासाठी कन्नड येथे संपर्क करतात सरकार मान्य शेतकऱ्यांसाठी पोखरा या माध्यमातून उभ्या करण्यात आलेल्या शेडनेटमध्ये विविध उत्पादने घेऊन शेतकऱ्यांना उत्पन्नाचे साधन मिळवून देतात वेळोवेळी होणाऱ्या हवामानाच्या बदलामध्ये विविध पिकांची निगराणी व व्यवस्थापन यासाठी मार्गदर्शन करतात यांच्या या कार्यामुळे अति प्रगतशील शेतकरी बांधवांचा यांना पाठिंबा आहे यांच्या कामगिरीत नर्सरी रोपवाटिका व शेतकरी यांना होलसेल दरात बियाणे व शेती विषयक वस्तूंचे पुरवठा याचाही समावेश होतो

# प्राध्यापकांनी आंतरविद्याशाखीय कौशल्य आत्मसात करावे - आयक्यूएसी समन्वयक डॉ. वासुदेव उगले




**जालना :** श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात प्राध्यापक ज्ञान प्रबोधिनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा प्रारंभ आज उत्साहात झाला. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी.तळेकर यांच्या हस्ते करण्यात आले, नवीन शिक्षण धोरणाच्या मागण्या पूर्ण करत असताना प्राध्यापकांनी सर्जनशील व नाविन्यपूर्ण उपक्रमांची कास धरावी,तंत्रज्ञान व शिक्षणप्रणाली यामधील नव्या शक्यता शोधण्याची प्रेरणा दिली.तर कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत प्रा. पूजा आरोरा म्हणाल्या, "या कार्यशाळेचा उद्देश प्राध्यापकांच्या सृजनशीलतेला आणि तंत्रज्ञानविषयक कौशल्यांना चालना देणे हा आहे.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आंतरविद्याशाखीय ज्ञानविस्तार ही काळाची गरज झाली आहे. डॉ.विजय नागोरी यांची विशेष उपस्थिती होती , आयोजक व सहभागी सर्वांना यशस्वी कार्यक्रमासाठी हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिली. डॉ.उगले म्हणाले की,आज प्राध्यापकांनी केवळ एकच विषय धरून न बसता आपल्या ज्ञानाच्या अनेक कौशल्याच्या कक्षा विस्तारणे महत्त्वाचे झाले आहे. म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोजन प्राध्यापकांनी आत्मसात करावे ही काळाची गरज आहे. वर्गात शिकविणारा प्राध्यापक आंतरविद्याशाखीय वैचारिक बैठकीचा असेल तर तो निश्चितच विद्यार्थ्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला आकार देऊ शकतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील उपयोजित अभ्यासक्रमाचा भाग लक्षात घेऊन यूट्यूबवर कार्यक्रमाचे प्रत्यक्ष सादरीकरण कसे करायचे याचे प्रात्यक्षिक व कॅनव्हा या वेबसाईटचा वापर करून वेगवेगळ्या बॅनरचे डिजाईन कसे कमीत कमी वेळेत व आपल्या विविध कार्यक्रमाची आकर्षकता वाढविण्यासाठी अगदी सोप्या भाषेत कार्यशाळेच्या प्रेरणा दिली.

इंग्रजी विभागाच्या प्राध्यापिका पूजा आरोरा यांनी पुष्पा टू या चित्रपटातील कथानकाचे परीक्षण करून समाजातील विकृत मानसिकतेवर आपल्या शोध निबंधातून प्रचंड प्रहार केले. त्या नायकाचा दबलेला आवाज हा प्रतिमांचा योग्य वापर करून मांडण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. आपल्या जवळ बंगला, गाडी, प्रचंड पैसा असूनही काहीच नाही ही पुष्पा टू या चित्रपटातील नायकाची खंत मांडली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाचे सहायक प्राध्यापक प्रवीण घुगे यांनी शब्दाची गुंफन माळत कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हिन्दी विभागाच्या सहायक प्राध्यापिका सीमा गुप्ता यांनी केले. यावेळी डॉ.स्वाती महाजन,ग्रंथपाल प्रा.अंभोरे ,प्रा.अंजु कुलकर्णी, जयश्री वाडेकर,डॉ.केशव सोळंके,डॉ.सचिन शेवतेकर, पापाजी चव्हाण यांची उपस्थिती होती.

# डॉ संजय अस्वले यांची करिअर कट्टा धाराशीव जिल्ह्याच्या प्राचार्य प्रवर्तक पदी निवड.



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहीती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करिअर कट्टा अंतर्गत धाराशीव जिल्ह्याच्या प्राचार्य प्रवर्तक पदी डॉ संजय अस्वले यांची निवड झाली.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणुन डॉ अस्वले कार्यरत आहेत. त्यानी करिअर कट्ट्याचे महाविद्यालयीन समन्वयक आणि धाराशीव जिल्ह्याचे समन्वयक म्हणुन गेली तीन वर्षे महाविद्यालया बरोबरच संपूर्ण जिल्ह्यात करिअर कट्टा विद्यार्थ्या पर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे. आपल्या महाविद्यालयास एक्सेलन्स सेंटर ए प्लस दर्जा मिळवून देण्यात त्यांचे योगदान आहे. तसेच महाविद्यालयीन पातळीवर संपूर्ण जिल्ह्यात विद्यार्थी संसद स्थापन करण्यात पुढाकार घेतला. याबद्दल गेली तीन वर्षे त्यांना उत्कृष्ट जिल्हा समन्वयक म्हणुन गौरवण्यात आले आहे. या कार्याची दखल घेऊन करिअर कट्ट्याचे प्रमुख श्री यशवंत शितोळे यानी त्यांना प्राचार्य प्रवर्तक म्हणुन निवड झाल्याचे पत्राद्वारे कळविले आहे.त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या करिअर कट्टा पोलिस अकॅडमी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र मधील विद्यार्थ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, डॉ विनोद देवरकर, करिअर कट्टा समन्वयक डॉ एस पी पसरकल्ले डॉ ए के कटके, डॉ सी.डी. करे, डॉ ए एस पदमपल्ले प्रा. आशिष घंटे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.सूत्र संचालन प्रज्वल पवार आणि आभार प्रदर्शन डॉ ए के कटके यानी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ फेब्रुवारी २०२५

## राजे उमाजी नाईक यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तालुक्यातील बेडर, बेरड, रामोशी, बहुजन समाज व जय मल्हार क्रांती संघटना संघटनेच्या वतीने आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या १९३ वी पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन राजे उमाजी नाईक चौक बायपास रोड उमरगा येथे सोमवारी (ता. तीन) रोजी घेण्यात आले. या शिबीरात 50 युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या पुण्यतिथी प्रसंगीआमदार प्रवीण स्वामी, तहसीलदार गोविंद एरमे,नायब तहसीलदार रतन काजळे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, अश्लेष भैया मोरे मित्र मंडळाचे अध्यक्ष विशाल कानेकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक किरण कुकुर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यासाठी आयोजक अशोक ममाळे, नागनाथ कोराळे, दिलीप कलमले, महेश व्हनाळे, राहुल खवडे, कन्हैया बुकले, नितीन कुकुर्डे, मारुती पाटील, सचिन जमादार, गोपाळ वासुदेव, कृष्णा जमादार, ज्ञानेश्वर यंपाळे, रायान्ना बुकले, शाहूराज जमादार, नेताजी मंडले, तुकाराम ममाळे, काशिनाथ जमादार यांच्यासह श्रीकृष्ण रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी यासाठी पुढाकार घेतला.

## महिला महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थिनींना राष्ट्रीय संस्कृत संस्थानची शिष्यवृत्ती प्राप्त

**छत्रपती संभाजीनगर (डॉ. प्रतिभा धोंडकर):** राष्ट्रीय संस्कृत संस्थान (Central Sanskrit University) संस्कृत शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबवित आहे. या योजनेंतर्गत नववीपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्यातर्फे भारतीय विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषा आणि साहित्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही शिष्यवृत्ती शैक्षणिक सत्र २०२४-२५ साठी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला वरिष्ठ महाविद्यालयाच्या १९ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या ०६ अशा एकूण २५ विद्यार्थिनींना मंजूर झाली आहे. २०१५-१६ च्या शैक्षणिक सत्रापासून महाविद्यालयातील संस्कृत विभागातील विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती प्राप्त होत आहे हे विशेष. वरिष्ठ महाविद्यालयासाठी ८०००/- व कनिष्ठ महाविद्यालयासाठी ६०००/- रुपये असे या शिष्यवृत्तीचे स्वरूप आहे.

शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थिनीत भाग्यश्री नंद, गीता जोशी, मनिषा पानमळकर-इरतकर, साफल्य धानोरकर, तनुजा पळसकर, धनश्री पिंपळे, नयन देशपांडे, साक्षी नागरगोजे, नम्रता शिंदे, हर्षदा सोनवणे, संपदा सोनवणे, प्राजक्ता पाटील, सृष्टी घुमरे, शीतल कलगुटकर, आर्या खुंटे, मृदुला शेवाळकर, साक्षी पिंपळे, सावनी सावंत, अनुष्का पुरी, राधिका दैठणकर, भार्गवी मोदी, अर्पिता कदम, उन्नती उमरकर, मनस्वी मगरे, राधा बादशाह यांचा समावेश आहे. सलग दहा वर्षांपासून महाविद्यालयातील संस्कृत विभागातील विद्यार्थिनींना ही विशेष शिष्यवृत्ती प्राप्त होत असल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी संस्कृत विभाग प्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार, प्रा. माधुरी भावसार, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी व विभागातील विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.




## शिवाजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आनंदनगरीने उदघाटन



**कन्नड (प्रकाश खेत्री)** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, रामराव अण्णा बहिरगावकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आनंदनगरीने (ता. ७) उदघाटन संपन्न झाले. उदघाटक म्हणून चार्टर्ड अकाऊंटट व माजी विद्यार्थी सुदाम मोहिते यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून संपन्न झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. मंचावर प्राचार्य राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अभय आहेर, प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. विजय मातकर, डॉ. प्रकाश महाजन, डॉ. अलका गडकरी , किशोर मोहिते यांची उपस्थिती होती.

यावेळी सुदाम मोहिते म्हणाले की, मी या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असून माझ्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उदघाटन होत आहे. हा माझ्या जिवनातील अविस्मरणीय क्षण आहे. आनंद नगरीतून विद्यार्थ्यावर उद्योजकीय संस्कार होऊन त्यांना व्यवहारिक ज्ञान मिळते. विद्यार्थ्यांनी या स्नेहसंमेलनाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. आनंद नगरीत २८ स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले. पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक डॉ.के. एल. भानुसे यांनी केले.

यावेळी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्नेह संमेलनातील विविध उपक्रमात सहभागी होऊन व्यक्तिमत्व विकास साधावा असे आवाहन केले. दुपारी सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये विविध कला प्रकारात विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन विविध कलाविष्कार सादर करून रंगत आणली. सूत्रसंचलन डॉ. मंगेश जाधव यांनी केले. विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येनी उपस्थित होते. आभार प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे यांनी आभार मानले.

## पुण्यात १४ वी भारतीय छात्र संसद

**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय १४वीं 'भारतीय छात्र संसद' दि.८ ते १० फेब्रुवारी रोजी विवेकानंद सभामंडप, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, कोथरूड, पुणे येथे होणार आहे.छात्र संसदेचे हे १४ वे वर्ष आहे. अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस यांनी कर्टन रेझर पत्रकार परिषदेत दिली.

१४ व्या भारतीय छात्र संसदेचे उद्घाटन, शनिवार, दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते होणार आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष प्रा.राम शिंदे, राजस्थान विधान परिषदेचे माजी सभापती डॉ.सी.पी. जोशी आणि सीएमओ बीओएटीचे सह संस्थापक अमन गुप्ता हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.या प्रसंगी उत्तर प्रदेश विधानसभेचे सभापती सतीश महाना यांना आदर्श विधानसभा सभापती पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे.

पहिले सत्र, शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी दुपारी २.०० वाजता सुरू होणार आहे. 'भारतीय राजकारणाची विचारधारा डावीकडे, उजवीकडे की नजरेच्या बाहेर' या विषयावर हिमाचल प्रदेश विधानसभेचे सभापती कुलदिपसिंह पठानिया, एनएसयुचे प्रमुख डॉ. कन्हैया कुमार, माजी खासदार अ‍ॅड.ए.ए.रहिम, खासदार राजकुमार रौत हे आपले विचार मांडतील. विद्यार्थ्यांसाठी दुपारी ४.१५ वा. 'युथ टू युथ कनेक्ट' हे विशेष सत्र होईल.

दूसरे सत्र, रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होणार आहे. 'रेवडी संस्कृती- एक आर्थिक भार किंवा आवश्यक आधार' या विषयावर झारखंड विधानसभेचे सभापती रवींद्र नाथ महातो हे अध्यक्षस्थानी असतील. प्रसिद्ध टिव्ही जर्नालिस्ट रुबिका लायक्वत, कॉंग्रेसचे मीडिया आणि प्रसिद्धी विभागाचे अध्यक्ष पवन खेरा, माजी मंत्री नवज्योत सिंग सिद्धू, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस तरूण चुघ, खासदार रणजीत रंजन हे विचार मांडतील. तिसरे सत्र, रविवार दि ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.४५ वा. सुरू होणार आहे. 'भारतीय संस्कृती की पाश्चात्य ग्लॅमर : भारतीय युवकांची कोंडी' या विषयावर बिहार विधानसभेचे अध्यक्ष नंद किशोर यादव हे विचार मांडतील. या वेळी सिव्हिल एव्हिएशन मंत्री राम मोहन नायडू किंजिरापू यांना भारत अस्मिता जन प्रतिनिधी श्रेष्ठ पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. या प्रसंगी प्रसिद्ध अभिनेत्री खुशबू सुंदर व लोकसभा सदस्य अरूण गोविल हे उपस्थित राहणार आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ फेब्रुवारी २०२५


## लाडकी बहीण योजनेतून ५ लाख लाभार्थी वगळले




**मुंबई :** महायुती सरकारच्या महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून सुमारे ५ लाख लाभार्थ्यांना वगळण्यात आल्याची माहिती राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी दिली. या अपात्र महिलांमध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असणाऱ्या सुमारे २ लाख ३० हजार महिलांचा समावेश आहे हे विशेष.

महायुती सरकारने गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांची अर्थसहाय्य केले जात आहे. त्याचा महायुतीला निवडणुकीत मोठा फायदा झाला. पण आता सरकारने या योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. त्यात अनेक महिलांनी खोटी माहिती देऊन या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर येत आहे. विशेषत: इतर सरकारी योजनांतील लाभार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सरकार या प्रकरणी काटेकोट पडताळणीवर भर देत आहे.

राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी एका ट्विटद्वारे लाडकी बहीण योजनेतून ५ लाख महिलांना वगळण्यात आल्याची माहिती दिली. त्या आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या, दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेतून वगळण्यात येत आहे. त्यानुसार संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असणाऱ्या २ लाख ३० हजार महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. तसेच वय वर्षे ६५ हून अधिक असणाऱ्या १ लाख १० हजार महिलांची नावेही या योजनेतून हटवण्यात आली आहेत.

कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या, स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १ लाख ६० हजार महिलांची नावेही लाडकी बहीण योजनेतून कमी करण्यात आली आहे. त्यामुळे एकूण ५ लाख महिला लाभार्थ्यांची नावे या योजनेतून वगळण्यात आली आहेत, असे आदिती तटकरे यांनी म्हटले आहे. सर्व पात्र महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबध्द आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दुसरीकडे, या योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता केव्हा मिळेल याविषयी महिला वर्गात चर्चा सुरू झाली आहे. जानेवारीचा हप्ता महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यानंतर मिळाला होता. त्यामुळे या महिन्यातही त्याच कालावधीत लाभ मिळण्याची शक्यता आहे. विशेषत: महायुती सरकारने निवडणुकीच्या प्रचारात या योजनेतील अर्थसहाय्याची रक्कम १५०० वरून २१०० करण्याची ग्वाही दिली होती. आता राज्याच्या अर्थसंकल्पात तशी एखादी तरतूद केली जाते काय? असा सवालही या प्रकरणी चर्चिला जात आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## पुण्यात PSI ने उचलले टोकाचे पाऊल



**पुणे :** पुण्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पोलिस उपनिरीक्षक अण्णा गुंजाळ यांनी लोणावळा येथील टायगर पॉइंटजवळ असलेल्या झाडाला गळफास घेत आत्महत्या केली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. तसेच पोलिस उपनिरीक्षक अण्णा गुंजाळ यांनी हे टोकाचे पाऊल का घेतले, याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

पोलिस उपनिरीक्षक अण्णा गुंजाळ हे खडकी पोलिस ठाण्यात कार्यरत होते. गेल्या तीन दिवसांपासून ते कर्तव्यावर देखील नव्हते आले. त्यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता, संपर्कही होत नव्हता. त्यानंतर आज त्यांचा शोध लागला तेव्हा अण्णा गुंजाळ हे लोणावळा येथील टायगर पॉइंट जवळ एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. टायगर पॉइंटजवळ त्यांची गाडी देखील सापडली आहे. या गाडीत एक डायरी देखील पोलिसांना सापडली आहे. पोलिस आता या संपूर्ण घटनेचा तपास करत आहेत.

दरम्यान, खडकी पोलिस यांच्यासह लोणावळा ग्रामीण पोलिस देखील घटनास्थळी पोहोचले असून मृत पोलिस उपनिरीक्षक अण्णा गुंजाळ यांचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला आहे. तसेच त्यांची गाडी देखील पोलिसांनी टायगर पॉइंटवरून ताब्यात घेतली आहे. आता त्यांच्या गाडीत सापडलेल्या डायरीचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. या डायरीमध्ये कदाचित आत्महत्येचे कारण सापडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, पुण्यात एका वाहतूक पोलिसावरच जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. फोनवर बोलत दुचाकी चालवणाऱ्या व्यक्तीला रोखल्याने वाहतूक पोलिसावरच प्राणघातक हल्ला केल्याचे समजते. यात वाहतूक पोलिस राजेश गणपत नाईक जखमी झाले असून उपचार सुरू आहेत. ही घटना पुण्यातील फुरसुंगी भेकराईनगर चौकात घडली.

पुण्यातील फुरसुंगी भेकराईनगर चौकात राजेश नाईक हे कर्तव्यवर असताना त्यांना एक दुचाकी चालक फोनवर बोलत गाडी चालवताना दिसला. तेव्हा त्यांनी त्याला अडवले. मात्र, याचा राग येऊन दुचाकी चालकाने रस्त्यात पडलेला दगड वाहतूक पोलिस राजेश नाईक यांच्या डोक्यात मारला. यात राजेश नाईक गंभीर जखमी झाले आहेत. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर आरोपी फरार झाला असून त्याचा शोध पोलिस घेत आहेत.

## अशोक मोहिते मारहाण प्रकरण

**धाराशिव :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड संदर्भातील बातम्यांचे व्हिडिओ का पाहतो? या रागातून अशोक मोहिते यांना मारहाण झाल्याची घटना घडली होती. या घटनेत अशोक मोहिते हे गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेण्यात धारूर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील मारहाण करणारे वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप या दोघांना धारूर पोलिसांनी कर्नाटक येथून ताब्यात घेतले. यातील वैजनाथ बांगरला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर अभिषेक सानप हा अल्पवयीन असल्याने त्याला बाल न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

आरोपी वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप या दोघांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. 'मिस यु भाई' म्हणत त्यांनी स्टेटसला कृष्णा आंधळे याचे फोटो देखील ठेवले होते. या प्रकरणी या दोघांवर पोलिसांनी कारवाई करणार असल्याचे देखील म्हटले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी असलेला कृष्णा आंधळे अद्याप पोलिसांना सापडलेला नाही. या कृष्णा आंधळे याचेच वैजनाथ बांगर आणि अभिषेक सानप हे दोघे मित्र असल्याचे बोलले जात आहे. अशोक मोहिते यांना मारहाण झाल्यानंतर धारूर पोलिसांनी या दोघांचा तपास करण्यासाठी विशेष पथकाची स्थापना केली होती. या पथकाने अभिषेक सानप आणि वैजनाथ बांगर यांना कर्नाटक मधून ताब्यात घेतले आहे.